## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- १४३४/२०२२

**अपिलार्थी, श्री.पुंडलिक सिताराम पाटील,**
मु.पो.दाभाड, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय दाभाड,
मु.पो.दाभाड, ता.भिवंडी, जि.ठाणे

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय भिवंडी, तहसिल कार्यालयाच्या बाजुला, भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०८.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १२.०१.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.१२.२०२१ | -- | २८.०२.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०९.०५.२०२२ रोजीच्या अर्जान्वये " *जन माहिती अधिकारी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतरही माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आजपर्यत सुनावणी लावली नाही. माहिती मिळाली नाही.* "असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १२.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" दि.०१ एप्रिल, २०१५ ते दि.३० नोव्हेंबर, २०२१ या कालावधीतील आवक रजिस्टर, जावक रजिस्टर (साठा रजिस्टर, वाटप रजिस्टर) सत्यप्रती मिळणेबाबत. "*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये असा खुलासा केला आहे की, त्यांनी दि.०८.१२.२०२१ रोजी ग्रुप ग्रामपंचायत दाभाड ता.भिवंडी, जि.ठाणे येथे माहिती अधिकारा अंतर्गत माहिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्याप्रमाणे ग्रुप ग्रामपंचायत दाभाड यांनी त्यांना पत्र देऊन माहितीच्या कागदपत्रांचे एकूण सात हजार रक्कम भरण्यासाठी दिनांक ०७.०१.२०२२ रोजी पत्र दिले. त्यानुसार त्यांनी दि.२४.०१.२०२२ रोजी रक्कम रुपये ७०००/- (सात हजार) चेकद्वारे स्टेट बँक शाखा भिवंडी येथे भरणा केले व चलन दि.२५.०१.२०२२ रोजी ग्रुप ग्रामपंचायत दाभाड कार्यालयात जमा केले. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली म्हणून त्यांनी नाईलाजास्तव दि.२८.०२.२०२२ रोजी पहिले अपील पंचायत समिती भिवंडी यांना सादर केले. परंतु पहिले अपील करुनही संबंधित प्रथम अपीलीय अधिकारी, श्री.सुधाकर सोनावणे यांनी आजपर्यंत सुनावणी लावली नाही व मागीतलेली माहिती त्यांना मिळाली नाही. त्यामुळे ते व्यथित झाले आहेत. तरी त्यांचे म्हणणे असे आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनवणे यांनी माहिती अधिकार कायद्याच्या अवमान केल्यामुळे त्यांना दंड लावून तसेच त्यांनी माहिती मिळवण्या पोटी भरलेली रक्कम रुपये ७०००/- (सात हजार), तसेच प्रवासापोटी व इतर झालेला खर्च रु.२५,०००/- व त्यांना या प्रकरणात झालेला मानसिक त्रास त्या पोटी रु.३०,०००/- (तीस अजार) रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळणेबाबतची मागणी केली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०८.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सदर माहितीच्या शुल्काची रक्कम भरणा केल्यानंतर देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दाभाड, ता.भिवंडी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती भिवंडी यांनी सुनावणी घेऊन आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दाभाड, ता.भिवंडी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०८.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपिलार्थी यांनी सदर शुल्काचा भरणा केल्यानंतरही त्यांना विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती भिवंडी, ता.भिवंडी यांनी अपीलार्थी यांनी दिनांक २८.०२.२०२२ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०४.०३.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ जानेवारी, २०२६.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय भिवंडी, तहसिल कार्यालयाच्या बाजुला, भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०८. व

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी, जि.ठाणे.

**- यांना प्रत**

विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय भिवंडी, तहसिल कार्यालयाच्या बाजुला,
भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०८.**यांचे मार्फत रवाना.**

**सुनावणी दिनांक ०४.०३.२०२६ ( In Continuation of order dt. १२.०१.२०२६)**

## विवेचन

उपरोक्त दि.१२.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते व तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०४.०३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री.शांताराम गोविंद पाटील उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधींनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगाने दि.१२.०१.२०२६ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी यांना माहिती पुरविण्यास झालेल विलंबाबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे यांनी कोणताही खुलासा सादर केला नाही व ते सुनावणीसही हजर राहिले नाहीत. तसेच तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती भिवंडी, ता.भिवंडी यांना त्यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नसल्याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. तथापि ते आजच्या सुनावणीस उपस्थित

राहिले नाहीत व कोणताही खुलासा सादर केला नाही. या कारणामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी व तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती भिवंडी, ता.भिवंडी यांना त्यांचा खुलासा सादर करण्यासाठी एक संधी देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या दि.१२.०१.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा लेखी खुलासा स्वत: उपस्थित राहून सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी यांनी आयोगाच्या दि.१२.०१.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती पुरविल्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी यांनी आयोगाच्या दि.१२.०१.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबतचा लेखी खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती भिवंडी, ता.भिवंडी यांनी आयोगाच्या दि.१२.०१.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा लेखी खुलासा पुढील सुनावणीचया वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.०४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल..

सही/-

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०४ मार्च, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय भिवंडी, तहसिल कार्यालयाच्या बाजुला, भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०८. व

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी, जि.ठाणे.

**- यांना प्रत**

विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय भिवंडी, तहसिल कार्यालयाच्या बाजुला,
भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे ४२१ ३०८.**यांचे मार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक ०४.०५.२०२६ ( In Continuation of order dt.०४.०३.२०२६)

## विवेचन

उपरोक्त दि.०४.०५.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती लादण्याबाबत व तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०४.०५.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री.शांताराम गोविंद पाटील उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.इंद्रजीत गणपत काळे, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती भिवंडी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र काशिनाथ बोरसे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दाभाड, ता.भिवंडी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधींनी असे निवेदन केले की, आयोगाच्या दि.१२.०१.२०२६ रोजीच्या आदेशानंतर अद्यापपावेतो विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी, जि.ठाणे यांनी दि.१३.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा खुलासा सादर केला आहे. सदर खुलाश्यात त्यांनी असे नमूद केले की, त्यांनी अपिलार्थी यांना दप्तरी उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. तथापि अशी माहिती केव्हा दिलेली आहे. याबाबत त्यांनी त्यांचे खुलाश्यात काहीही नमूद केलेले नाही. आयोगाच्या दि.१२.०१.२०२६ रोजीच्या आदेशानंतर ही माहिती दिलेली आहे का, अशी विचारणा त्यांना केली असता, ती आदेशानंतर त्यांना देण्यात आली नाही. ती दि.१२.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना दिलेली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी तोंडी सांगितले. या पत्राची प्रत त्यांनी आयोगाच्या अवलोकनार्थ सादर केली आहे. या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थी यांना असे कळविले आहे की, त्यांनी मागणी केलेल्या कालावधीतील माहिती ग्रामपंचायत दप्तरी आढळून येत नाही.

मागणी केलेली माहिती ही आवक-जावक रजिस्टर, साठा व वाटप रजिस्टर या रजिस्टरच्या प्रतींची आहे. कोणत्याही ग्रामपंचायत कार्यालयात किंबहुना कोणत्याही शासकिय कार्यालयात आवक रजिस्टर व जावक रजिस्टर ठेवणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे साठा रजिस्टर व वाटप रजिस्टर हे देखील ग्रामपंचायत मध्ये ठेवणे आवश्यक आहे. ग्रामंपचायत मध्ये ग्रामपंचायतीने खरेदी केलेल्या वस्तु, इत्यादि नोंद व या वस्तुंचा वापर ज्या कामासाठी केला असेल, त्याची नोंद वाटप रजिस्टरमध्ये केली जाते. म्हणजेच हे चारही रजिस्टर ग्रामपंचायत दाभाड येथे उपलब्ध असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत ही माहिती उपलब्ध नाही ही जर वस्तुस्थिती असेल, तर ती का उपलब्ध नाही हे देखील कळविणे आवश्यक होते. दि.१२.०१.२०२६ रोजीच्या आयोगाच्या आदेशामध्ये या बाबत स्पष्टपणे असे नमूद केले आहे की "जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्येनिहाय स्पष्ट व विविक्षीत उत्तर अपिलार्थी यांना १५ दिवसांत पाठवावे." म्हणजेच आवक-जावक रजिस्टर तसेच साठा व वाटप रजिस्टर ही माहिती का उपलब्ध नाही हे जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे यांनी अपिलार्थी यांना आयोगाच्या आदेशानंतर १५ दिवसांत कळविणे आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या या आदेशाची संपूर्ण अवहेलना केली व त्यांनी या कालावधीत अपिलार्थी यांना कोणतेही उत्तर दिलेले नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बेजबाबदार पणाची व जाणीवपूर्वक केलेली कृती आहे. त्यामुळे यासंदर्भात त्यांनी दिलेला खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय भिवंडी, भिवंडी यांनी त्यांचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, ते स्वत: त्यावेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून कार्यरत होते. श्री.सुधाकर सोनावणे हे सदर कालावधीत विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत नव्हते. श्री.इंद्रजीत काळे यांच्या तोंडी निवेदनाची नोंद घेण्यात आली.

तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय भिवंडी यांनी त्यांच्या खुलाश्यात असे नमूद केले आहे की, त्यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून दि.२७.०६.२०२२ रोजी सुनावणी घेतलेली आहे व आदेश देखील पारित केलेले आहेत. या आदेशाची प्रत त्यांनी सादर केली आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांचे उपस्थितीत माहितीचा स्विकार करणेसंदर्भात् दि.११.०७.२०२२ पूर्वी ग्रामपंचायत कार्यालयात बोलवावे व त्यांना आवश्यक असणारी माहिती उपलब्ध करुन .ावी व त्यांचे समाधान होईल असे पहावे.

श्री.इंद्रजीत काळे यांनी सदर प्रकरणी सुनावणी घेऊन आदेश पारित केले असल्याने, त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी, जि.ठाणे यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ०५ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षा खाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती भिवंडी यांनी आयोगास सादर करावा.

२. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.सुधाकर सोनावणे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय भिवंडी यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक असून, त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांचेवरील प्रसतावित शिस्तभंगाची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

३. अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नसल्याने, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेल्या अहवालासह पुढील सुनावणीस स्वत/ उपस्थित रहावे.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती भिवंडी यांनी सदरचे अभिलेख गहाळ झालेबाबत दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द व तसा गहाळ झाल्याचा अहवाल श्री.राजेंद्र बोरसे यांनी पंचायत समिती येथे सादर न केल्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी व त्याचा अहवाल लेखी स्वरुपात पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. आयोगाच्या या आदेशाची प्रत गटविकास अधिकारी, पंचायत समिती भिवंडी यांना देण्यात यावी.

५. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१५.०६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चंन्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०४ मे, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे.

३. आहरण व संवितरण अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र बोरसे, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दाभाडे, ता.भिवंडी, जि.ठाणे.
**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालया दाभाड, ता.भिवंडी, जि.ठाणे.
**-यांचे मार्फत प्रत रवाना.**

